07 JUN 2026
जनप्रवास
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यास तसेच त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी केले अभिवादन : शिवगर्जनांच्या जयघोषात 'शिवज्योत रॅली' : शिवछत्रपतींवरील २ क्रेडिटचा अभ्यासक्रम अनिवार्य आणि मोफत : कुलगुरुंची घोषणा

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठात शनिवारी शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात आणि शिवमय वातावरणात साजरा झाला. शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला विद्यापीठाचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील २ क्रेडिटचा ऑनलाईन अभ्यासक्रम अनिवार्य आणि मोफत करणार असल्याची घोषणा कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी या निमित्ताने केली.

सकाळपासूनच विद्यापीठ परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची गाथा सांगणारे पोवाडे घुमत होते. कुलगुरू डॉ. रजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्यास तसेच त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर विद्यापीठ परिसरातून डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनच्या विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकासह ढोल-ताशांच्या गजरात आणि शिवगर्जनांच्या जयघोषात भव्य 'शिवज्योत रॅली' काढली. या रॅलीमुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला. कार्यक्रमात वेंगरूळ (ता. भुदरगड, जि. कोल्हापूर) येथील सव्यसाचि गुरुकुलमच्या कलाकारांनी पारंपरिक मर्दानी खेळांची प्रभावी प्रात्यक्षिके सादर केली. तलवारबाजी, दांडपट्टा, भालाफेक आणि लाठीकाठी यांसारख्या युद्धकौशल्यांचे सादरीकरण पाहून उपस्थितांनी दाद दिली. यानंतर राजर्षी शाहू सभागृहात विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये विद्यार्थिनी कीर्ती आंबेडकर हिने सादर केलेल्या पोवाड्याने उपस्थितांना शिवकालीन पराक्रमाची अनुभूती दिली. वैष्णवी पोतदार हिने छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टी, नेतृत्वगुण आणि स्वराज्य संकल्पनेवर प्रभावी भाषण केले. तसेच, मर्दानी खेळांची झलक आणि शिवराज्याभिषेकावर आधारित नृत्य सादरीकरणाने कार्यक्रमावर कळस चढविला.

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, स्वराज्य आणि राष्ट्रनिर्मितीच्या विचारांचा प्रेरणादायी वारसा अनुभवता आला. या कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, मानव्यविज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, अंतर्गत गुणवत्ता हमीकक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. कबीर खराडे यांच्यासह विद्यापीठातील शिक्षक, अधिविभाग प्रमुख, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी सहभागी झाले. सुरेखा आडके, विजय इंगवले यांच्यासह विद्यार्थी विकास विभागातील सहकाऱ्यांनी कार्यक्रमाचे नेटके आयोजन केले. डॉ. प्रमोद पाटील यांनी आभार मानले. रायगड येथे साजऱ्या होणाऱ्या शिवराज्याभिषेक कार्यक्रमासाठी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे पथक गेले असून कार्यक्रमानंतर स्वच्छता मोहीम राबवून परत येणार आहे.



शिवाजी विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन प्रसंगी कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह अधिकारी.



कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठ प्रांगणातून शिवज्योत रॅली काढण्यात आली.

### विद्यापीठातील सर्व विद्यार्थ्यांसाठी शिवरायांचा २ क्रेडिटचा अभ्यासक्रम मोफत व अनिवार्य : कुलगुरु

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत भारतीय ज्ञान प्रणालीला अनुसरून शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्य, प्रशासन, न्यायव्यवस्था आणि स्वराज्य संकल्पनेवर आधारित दोन क्रेडिटचा ऑनलाईन अभ्यासक्रम अनिवार्य आणि मोफत करीत असल्याची घोषणा कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रमात केली. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि कार्य हे भारतीय ज्ञान प्रणालीचे प्रभावी आदर्श असून, त्यांच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांना नेतृत्व, न्याय, प्रशासन आणि राष्ट्रनिर्मितीचे मूल्य शिकता येईल, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.



कोल्हापूर : शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात मान्यवरांसमोर मर्दानी खेळांची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करताना वेंगरूळ (ता. भुदरगड) येथील सव्यसाचि गुरुकुलमच्या कलाकारांचे पथक.

07 JUN 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात आणि शिवमय वातावरणात साजरा करण्यात आला. शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला विद्यापीठाचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील २ क्रेडिटचा ऑनलाईन अभ्यासक्रम अनिवार्य व मोफत करणार असल्याची घोषणा कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी या निमित्ताने केली.

सकाळपासूनच विद्यापीठ परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची गाथा सांगणारे पोवाडे घुमत होते. कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्यास, तसेच त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठ परिसरातून डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनच्या विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकासह ढोल-ताशांच्या गजरात आणि शिवगर्जनेच्या जयघोषात भव्य 'शिवज्योत रॅली' काढण्यात आली. रॅलीमुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिनानिमित्त मर्दानी खेळांची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

कार्यक्रमात वेंगरूळ, ता. भुदरगड येथील सव्यसाची गुरुकुलमच्या कलाकारांनी पारंपरिक मर्दानी खेळांची प्रभावी प्रात्यक्षिके सादर केली. तलवारबाजी, दांडपट्टा, भालाफेक आणि लाठी-काठी यासारख्या युद्धकौशल्यांचे सादरीकरण पाहून उपस्थितांनी दाद दिली.

यानंतर राजर्षी शाहू सभागृहात विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये विद्यार्थिनी कीर्ती आंबेडकर हिने सादर केलेल्या पोवाड्याने उपस्थितांना शिवकालीन पराक्रमाची अनुभूती दिली. वैष्णवी पोतदार हिने छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टी, नेतृत्वगुण आणि स्वराज्य संकल्पनेवर प्रभावी भाषण केले. तसेच मर्दानी खेळांची झलक आणि शिवराज्याभिषेकावर आधारित नृत्य सादरीकरणाने कार्यक्रमावर कळस चढवला.

कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. राजाराम गुरव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. कबीर खराडे आदी उपस्थित होते. सुरेखा आडके, विजय इंगवले यांच्यासह विद्यार्थी विकास विभागातील सहकाऱ्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. डॉ. प्रमोद पाटील यांनी आभार मानले. दरम्यान, रायगड येथे साजऱ्या होणाऱ्या शिवराज्याभिषेक दिनाच्या प्रमुख कार्यक्रमासाठी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे पथक रायगडावर दाखल झाले आहे. कार्यक्रमात सहभागाबरोबरच कार्यक्रमानंतर गडावर स्वच्छता मोहीम राबवून हे पथक माघारी परतणार आहे.

## शिवरायांचा २ क्रेडिटचा अभ्यासक्रम मोफत व अनिवार्य

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत भारतीय ज्ञान प्रणालीला अनुसरून शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनकार्य, प्रशासन, न्यायव्यवस्था आणि स्वराज्य संकल्पनेवर आधारित दोन क्रेडिटचा ऑनलाईन अभ्यासक्रम अनिवार्य आणि मोफत करत असल्याची घोषणा कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रमात केली. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि कार्य हे भारतीय ज्ञानप्रणालीचे प्रभावी आदर्श असून, त्यांच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांना नेतृत्व, न्याय, प्रशासन आणि राष्ट्रनिर्मितीचे मूल्य शिकता येईल, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JUN 2026

तरुण भारत

# शिवरायांवरील दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम

■ कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांची घोषणा

। त. भा. प्रतिनिधी, कोल्हापूर

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत भारतीय ज्ञान प्रणालीला अनुसरून शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शिवरायांच्या जीवनकार्य, प्रशासन, न्यायव्यवस्था व स्वराज्य संकल्पनेवर आधारित दोन क्रेडिटचा 'ऑनलाईन अभ्यासक्रम अनिवार्य व मोफत करत असल्याची घोषणा कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रमात केली.

कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्यास तसेच त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सकाळपासूनच विद्यापीठ परिसरात पोवाडे घुमत होते. लेझीम पथकासह ढोल–ताशांच्या गजरात भव्य 'शिवज्योत रॅली' काढण्यात आली. वेंगरूळ (ता. भुदरगड) येथील सव्यसाचि गुरुकुलमच्या कलाकारांनी तलवारबाजी, दांडपट्टा, भालाफेक आणि लाठीकाठी यांसारख्या युद्धकौशल्यांचे सादरीकरण केले. कीर्ती आंबेडकर हिने सादर केलेल्या पोवाडा सादर केला. वैष्णवी पोतदार हिने मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. राजाराम गुरव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. कबीर खराडे आदींसह विद्यापीठातील प्रमुख सहभागी झाले होते.



**रायगडावर स्वच्छता मोहीम :**

**दरम्यान, रायगड येथे साजरा होणाऱ्या शिवराज्याभिषेक दिनाच्या प्रमुख कार्यक्रमासाठी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे पथक रायगडावर दाखल झाले आहे. कार्यक्रमात सहभागाबरोबरच कार्यक्रमानंतर गडावर स्वच्छता मोहीम राबवविण्यात येणार आहे.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JUN 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात शिवरायांवरील दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम अनिवार्य

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला विद्यापीठाचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील दोन क्रेडिटचा ऑनलाईन अभ्यासक्रम अनिवार्य व मोफत करणार, अशी घोषणा कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केली.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने असलेल्या विद्यापीठात सुरू होत असलेला हा राज्यातील पहिलाच कोर्स आहे.

विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी ही घोषणा केली. विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनकार्य, प्रशासन, न्यायव्यवस्था आणि स्वराज्य संकल्पनेवर आधारित दोन क्रेडिटचा ऑनलाईन अभ्यासक्रम असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 7 JUN 2026

जनप्रवास

# देसाई अध्यासनाला निधी देणार

## मंत्री शंभूराज देसाई : किमान वीस महाविद्यालयांत कार्यशाळा, व्याख्याने घ्या



**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन केंद्रातर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांसाठी राज्य शासनाकडून निधीची अजिबात कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही राज्याचे पर्यटन व खनिकर्म मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठात मंत्री देसाई यांनी लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन कामकाजाच्या अनुषंगाने आढावा बैठक घेतली. यासाठी कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख उपस्थित होते.

मंत्री देसाई म्हणाले, लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापुरात झाले. त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि जीवनकार्य याविषयी नव्या पिढीला माहिती व्हावी, या दृष्टीने विद्यापीठाने त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक जिल्ह्यात किमान वीस महाविद्यालयांमध्ये कार्यशाळा, व्याख्याने आदींचे आयोजन व्यापक पातळीवर करावे. तसेच ग्रामीण, शहरी अशा सर्वच स्तरांतील युवकांपर्यंत स्वर्गीय देसाई यांच्या भरीव कार्याची माहिती पोहोचविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करीत समाजमाध्यमांद्वारेही माहिती घ्यावी, अशी सूचना केली.

प्रारंभी अध्यासनाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत करून अध्यासनाच्या कामगिरीचा आढावा सादर केला. या बैठकीला डॉ. व्ही. जी. पानस्कर, डॉ. वैभव ढेरे, गजानन पळसे, डॉ. दत्तात्रय मचाले, अवधूत चव्हाण, डॉ. माया देसाई, डॉ. सोनल मंगल, संदीप केसरकर, डॉ. उमाकांत हत्तीकट आदी उपस्थित होते.

### लोकनेते देसाई दालनाचा प्रस्ताव तयार करावा

मंत्री शंभूराज देसाई म्हणाले, विद्यापीठाने लोकनेते देसाई दालनाचा प्रस्ताव तयार करून त्वरित शासनाकडे पाठवावा. यासाठी लागणाऱ्या आवश्यक पदांचा प्रस्तावही सादर करावा.

07 JUN 2026 ग्लोबल टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात वृक्षारोपण



कोल्हापूर : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत कॉमन फॅसिलिटी सेंटरच्या परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित होत्या. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांच्यासह अभिजीत जाधव, सॅटर्डे क्लबच्या कोल्हापूर पूर्व विभागाचे प्रमुख कुलदीप कोरगावकर, उपविभागीय प्रमुख शैलेश देशपांडे, सुषमा धर्माधिकारी, संदीप कदम, संस्थेचे पदाधिकारी आणि सदस्य तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 JUN 2026

तरुण भारत

# शरण साहित्य अध्यासनाचे लोकार्पण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शरण साहित्य अध्यासनाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण व उद्घाटन सोहळा सोमवार, दि.८ रोजी सकाळी ११ वा. होणार आहे. यासाठी जिल्हा नियोजन व विकास समिती, कोल्हापूर यांचे मार्फत प्राप्त दीड कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. याचे उद्घाटन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते होणार आहे. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ प्रमुख पाहुणे असणार आहेत. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत अध्यक्षस्थानी असणार आहेत. यावेळी आमदार सतेज पाटील, आमदार डॉ. विनय कोरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JUN 2026

पुढारी

# शरण साहित्य अध्यासनाच्या इमारतीचे उद्या लोकार्पण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शरण साहित्य अध्यासनाच्या नूतन इमारतीचा लोकार्पण व उद्‌घाटन समारंभ सोमवार, दि. ८ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. जिल्हा नियोजन व विकास समिती यांच्या निधीतून उभारलेल्या इमारतीचे उद्‌घाटन पालकमंत्री तथा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते होणार आहे. मंत्री हसन मुश्रीफ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. आर. के. कामत असतील. याप्रसंगी आ. सतेज पाटील, आ. डॉ. विनय कोरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, शरण साहित्य अध्यासनाच्या समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 JUN 2026

जनप्रवास

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात वृक्षारोपण

**कोल्हापूर :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत कॉमन फॅसिलिटी सेंटरच्या परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित होत्या. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.आसावरी जाधव यांच्यासह अभिजित जाधव, सॅटर्डे क्लबच्या कोल्हापूर पूर्व विभागाचे प्रमुख कुलदीप कोरगावकर, उपविभागीय प्रमुख शैलेश देशपांडे, सुषमा धर्माधिकारी, संदीप कदम, संस्थेचे पदाधिकारी आणि सदस्य, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JUN 2026

जनप्रवास

# दूरशिक्षण केंद्राच्या एमबीए प्रवेश प्रक्रिया फेरीचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रा मार्फत एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेनुसार विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया फेरी मंगळवार ९ जून रोजी सकाळी नऊ वाजता राबविण्यात येणार असल्याची माहिती संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली. एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एमबीए (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिलेली आहे, अशा विद्यार्थ्यांनी दूर शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे,असे आवाहन संचालक पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JUN 2026
तरुण भारत

# दूरशिक्षण केंद्राच्या एमबीए प्रवेश प्रक्रिया फेरीचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्यावतीने एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश परीक्षेनुसार विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रिया फेरीचे आयोजन केल्याची माहिती केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली. ही प्रवेश प्रक्रिया मंगळवार, दि.९ रोजी सकाळी ९ वा. शिवाजी विद्यापीठातील दूर शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयात राबविण्यात येणार आहे. एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन व प्रोडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एमबीए (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिलेली आहे. अशा विद्यार्थ्यांनी दूर शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले आहे.